पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या अधिनस्त कार्यालयाकरिता १०४४३ पदे निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः अेपीओ ३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बां.२/पोल-३

७ वा मजला, सेंटर-१, जागतिक व्यापार केंद्र,

मुंबई-४०० ००५.

दिनांक : ४ मार्च, २०१४

वाचा : पोलीस महासंचालक यांचे पत्र क्र. पोमसं/२६-अ/४७/अतिरिक्त पदनिर्मिती३१५/२०११, दि.२९.११.२०११ व दि. ३/११/२०१२.

प्रस्तावना-

दिनांक २.२.२००५ च्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये राज्य पोलीस दलासाठी प्रत्येक टप्प्यात ११०२१ याप्रमाणे पाच टप्प्यात ५५१०५ पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार बृहन्मुंबई करिता १०,४४३ व उर्वरित महाराष्ट्रासाठी ४४,६६२ अशी विविध संवर्गात एकूण ५५१०५ पदे त्यावेळेची परिस्थिती व लोकसंख्या विचारात घेवून निर्माण करण्यात आली आहेत.

सन २०११ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या ११,२३,७३,९७२ एवढी आहे. राज्य पोलीस दलाचे मंजूर मनुष्यबळ २,०८,४५४ एवढे असून त्यामध्ये गुन्हे अन्वेषण विभाग, राज्य गुप्तवार्ता विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, प्रशिक्षण, राज्य राखीव पोलीस दल, फोर्स वन, दहशतवाद विरोधी पथक इ.सारख्या विशेष शाखांचे मनुष्यबळही अंतर्भूत आहे. कायदा व सुव्यवस्था हाताळणा-या पोलीस आयुक्तालये व जिल्हा पोलीस घटकातील मंजूर मनुष्यबळ १,८१,४३९ एवढे आहे. त्यानुसार सध्याची लोकसंख्या विचारात घेता ६१९ लोकसंख्येमागे १ पोलीस असे प्रमाण येते. मुंबई शहर हे आतंरराष्ट्रीय स्तराचे शहर आहे. आंतरराष्ट्रीय शहरासाठी १०० ते १५० लोकसंख्येमागे १ पोलीस असे आदर्श प्रमाण आहे. लोकसंख्येचा विचार करता राज्य पोलीस दलातील विविध घटकांसाठी १,२२,७८८ एवढे मनुष्यबळ वाढविणे आवश्यक आहे. तथापि, एकदम एवढे मनुष्यबळ वाढविणे शक्य नसल्यामुळे आवश्यकतेच्या किमान ५०% म्हणजेच पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची ६१,४९४ एवढी नवीन पदे येत्या पाँच वर्षात पाच टप्प्यात निर्माण करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या प्रस्तावामध्ये पहिल्या टप्प्यात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवर १०८७९ नवीन पदे निर्माण करण्याचे

प्रस्तावित होते. पहिल्या टप्प्यात पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आस्थापनेवर नवीन ६४ पोलीस ठाणी व विविध घटकासाठी १०८७९ नवीन पदे निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने दि.१८.१०.२०१३ च्या बैठकीत तसेच मंत्रिमंडळाने दि. १७/१२/२०१३ च्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

**शासन निर्णय :**

वरील प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वांगिन विचार करुन पोलीस महासंचालक यांचे अधिनस्त कार्यालयाकरीता पोलीस दलासाठी विविध संवर्गातील १०४४३ पदे निर्माण करण्यास व त्या अनुषंगाने त्यातील काही पदे वापरुन राज्यातील विविध भागात ६३ पोलीस ठाणी निर्माण करण्यास सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे पोलीस महासंचालक यांच्या अधिनस्त असलेल्या विविध आस्थापनेकरीता विविध संवर्गातील १०४४३ (दहा हजार चारशे त्रेचाळीस) पदे निर्माण करुन ती भरण्यास शासन, याद्वारे खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देत आहे.

Sir
R.ar
9/5/14

अ) विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदांचा आस्थापना/ घटकनिहाय तपशील सोबतच्या विवरणपत्र "क" मध्ये दर्शविण्यात आल्याप्रमाणे राहील.

ब) विवरणपत्र "ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधीत घटकांच्या अधिपत्याखाली एकूण ६३ पोलीस ठाणी निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

क) खरेदी करावयाच्या साधनसामुग्री, फर्निचर,शस्त्र व दारुगोळा यांच्या तपशिल विवरणपत्र "ड" प्रमाणे राहील.

ड) विवरणपत्र "क" मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदांच्या बाबतीत राज्याच्या सीमावर्ती जिल्हयांच्या गरजा आणि इतर आवश्यक बाबी विचारात घेऊन घटकनिहाय पदे वाटपात बदल करण्याचे अधिकार शासनास राहतील.

इ) विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविण्यात आलेली पदे त्यासाठी केलेल्या सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार भरण्यात यावी. ज्या पदांच्या बाबतीत सेवाप्रवेश नियम तयार करण्यात आले नाहीत त्या पदांच्या बाबतीत सेवाप्रवेश नियम पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी तात्काळ तयार करुन शासनाकडून मान्य करुन घ्यावेत. सेवाप्रवेश नियम मान्य झाल्यानंतर सदरहू पदे सेवाप्रवेश नियमातील तरतूदीनुसार भरण्याची कार्यवाही करावी.

3

२. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ४३७/१३/व्यय-७, दि.२३.९.२०१३ व अनौपचारिक संदर्भ क्र. विसु-१/२९६, दि. २५.९.२०१३ अन्वये मान्यता घेऊन निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर पदनिर्मितीच्या अनुषंगाने २०१४-१५ मध्ये लागणा-या आवर्ती/ अनावर्ती खर्चासाठी योग्य मार्गाने स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सु.बा. रावडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, गृह विभाग

प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (गृह )यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
५) मा. राज्यमंत्री (गृह )यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई
६) प्रधान महालेखाकार (लेखा परिक्षा )-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा ), मुंबई / नागपूर.
८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
९) सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई
११) सर्व पोलीस आयुक्त, (लोहमार्गसह)
१२) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.
१३) सर्व विशेष पोलीस महानिरिक्षक.
१४) सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह)
१५) सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालये
१६) सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
१७) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१८) सर्व जिल्हा कोषगार अधिकारी
१९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
२०) सह संचालक, लेखा व कोषागरे, संगकण कक्ष,नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
२१) वित्त विभाग (व्यय-७) / वित्तिय सुधारणा-१
२२) गृह विभागातील सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी
२३) गृह विभागाच्या अधिनस्त असलेले सर्व विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख
२४) निवडनस्ती, पोल-३.

महासंचालक

## ४२) अपर पोलीस अधीक्षक, वाहतुक, म. राज्य, मुंबई

| | अधिकारी खुर्ची (पो.अ. पो.उप अ.) | अधिकारी खुर्ची (पो.नि. व तत्सम अधि.) | अधिकारी टेबल (पो.अ. पो.उप अ.) | अधिकारी टेबल (पो.नि. व तत्सम अधि.) | ऑफिस खुर्ची | ऑफिस टेबल | अभ्यागतासाठी खुर्ची | आफिस कपाट लोखंडी लॉकरसह | ऑफीस कपाट लॉकर शिवाय | जीप | दूरध्वनी कार्यालय | लाईट व्हॅन | बस/टयुब करीअर | बिनतारी संच (स्थिर) | वॉटर टॅकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| किंमत | ५००० | ३००० | ५००० | ५००० | ६०० | ३५०० | ६०० | ६००० | ४५०० | ६५०००० | १५०० | ८००००० | १०००००० | ३२००० | १०००००० |
| आवश्यक संख्या | ० | १३ | ० | १३ | १३२ | १३२ | १७ | ८ | ३ | ४ | २ | ४ | ६ | ५ | १ |
| एकूण किंमत | ० | ४२००० | ० | ७०००० | ७९२०० | ४६२००० | १०२०० | ४८००० | १३५०० | २६०००००० | ३००० | ३२००००० | ६०००००० | १६०००० | १०००००० |

| | वॉकी टॉकी संच | संगणक+सामग्री संच | झेरॉक्स मशिन | फॅक्स मशिन | गन कार्बाइन | ९.३३ पिस्तौल | रायफल (७.६२) SLR | ट्रक | मोटार सायकल | बारा बोर गन | आकस्मिक खर्च | पोलीसठाणे भाडे खर्च | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २७ | २८ | |
| किंमत | १५००० | ४५००० | ४०००० | १०००० | ३०००० | २०००० | ४०००० | १००००० | ६०००० | ४४००० | २०००० | २०००० | |
| आवश्यक संख्या | १२ | २ | २ | २ | १५ | ३३ | २० | १ | १४ | २ | १ | १ | |
| एकूण किंमत | १८०००० | ९०००० | ८०००० | २०००० | ४५०००० | ६६०००० | ८००००० | १००००० | ८४०००० | ८८००० | २०००० | २०००० | १७८२७९०० |

पोलीस-३९०९/प्र.क्र.[७००-३-२०९४]-२२

| (42) अपर पोलीस महासंचालक वाहतुक मुंबई | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | पोलीस ठाणे/ शाखा | पोउपआ/ पो.अ. | सपोआ/ पोउअधि | पोनि | सपोनि | पोउपनि | सपोउनि | पोहवा | पोना | पोशि | पोशिचा | वश्रेलि | स्टेनो | एकूण |
| 1 | वाहतूक | ० | ० | ४ | ४ | ५ | २२ | ३२ | ३२ | ४६ | ० | ० | ० | १४५ |

**मंजूर करण्यात आलेली रक्कम** :- आवर्ती रु.६८१८४०००/- अनावर्ती रु. : १७८२७१००/-

साधनसामुग्री, शस्त्र व दारुगोळा, फर्निचर -विवरणपत्र"ङ"प्रमाणे

लेखाशिर्ष: २०५५- पोलीस (००) १०९ जिल्हा पोलीस (००) (०१)जिल्हा पोलीस दल-दत्तमत (२०५५ ०१६८)

**शासन निर्णय क्र. ए[illegible]ओ/३१११/प्र.क्र.१०७(अ)/पु.बा.२/पोल - ३, दि.०४/०३/२०१४ अन्वये महामार्ग पोलीस सुरक्षा (मसुप) विभागाकरिता मंजूर केलेल्या १४५ पदांचे विवरण.**

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पुरविण्यात येणारे मनुष्यबळ | | | | | | | सबंधीत घटक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पो.नि. | सपोनि | पोउनि | सपोउनि | पोह | नापोशि | पोशि | |
| १. | नियंत्रण कक्ष, मसुप, ठाणे | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०२ | ठाणे (ग्रामिण) |
| २. | नियंत्रण कक्ष, मसुप, पुणे | ०० | ०० | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०२ | पुणे (ग्रामिण) |
| ३. | नियंत्रण कक्ष, मसुप, नागपूर | ०० | ०० | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०२ | नागपूर (ग्रामिण) |
| ४. | पोलीस अधिक्षक, मसुप, ठाणे | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | ठाणे (ग्रामिण) |
| ५. | पोलीस अधिक्षक, मसुप, पुणे | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०२ | ०४ | पुणे (ग्रामिण) |
| ६. | पोलीस अधिक्षक, मसुप, नागपूर | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०२ | ०३ | नागपूर (ग्रामिण) |
| ७. | पोलीस उप अधिक्षक, मसुप, ठाणे | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | ठाणे (ग्रामिण) |
| ८. | पोलीस उप अधिक्षक, मसुप, नाशिक | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | नाशिक (ग्रामिण) |
| ९. | पोलीस उप अधिक्षक, मसुप, पुणे | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | पुणे (ग्रामिण) |
| १० | पोलीस उप अधिक्षक, मसुप, नागपूर | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०२ | नागपूर (ग्रामिण) |
| ११. | पोलीस निरीक्षक,मसुप, ठाणे विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ठाणे (ग्रामिण) |
| १२. | पोलीस निरीक्षक,मसुप, पनवेल विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | नवी मुंबई |
| १३. | पोलीस निरीक्षक,मसुप, पुणे विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | पुणे (ग्रामिण) |
| १४. | पोलीस निरीक्षक,मसुप, नाशिक विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | नाशिक (ग्रामिण) |
| १५. | पोलीस निरीक्षक,मसुप, अहमदनगर विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | अहमदनगर |
| १६. | पोलीस निरीक्षक,मसुप, औरंगाबाद विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | औरंगाबाद (ग्रामिण) |
| १७. | पोलीस निरीक्षक,मसुप, अमरावती विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | अमरावती (ग्रामिण) |
| १८. | पोलीस निरीक्षक,मसुप, नागपूर विभाग | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | नागपूर (ग्रामिण) |
| २०. | पोलीस निरीक्षक,मसुप, रत्नागिरी विभाग | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | रत्नागिरी |
| २१. | पोलीस निरीक्षक,मसुप, धुळे विभाग | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | धुळे |
| २२. | पोलीस निरीक्षक,मसुप, सोलापूर विभाग | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | सोलापूर (ग्रामिण) |
| २३. | पोलीस निरीक्षक,मसुप, नांदेड विभाग | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | नांदेड |
| २४. | म.पो.केंद्र पळस्पे | ०० | ०० | ०० | ०६ | ०१ | ०२ | ०३ | नवी मुंबई |
| २५. | म.पो.केंद्र बोरघाट | ०० | ०० | ०० | ०६ | ०२ | ०२ | ०२ | रायगड |
| २६. | म.पो.केंद्र खंडाळा | ०० | ०० | ०० | ०५ | ०२ | ०२ | ०२ | पुणे (ग्रामिण) |
| २७. | म.पो.केंद्र वडगांव | ०० | ०० | ०० | ०५ | ०२ | ०१ | ०२ | पुणे (ग्रामिण) |
| | एकुण | ०४ | ०४ | ०५ | २२ | ३२ | ३२ | ४६ | |